July 19, 2026

To, **BSE Limited**, 25, P. J. Towers, Dalal Street, Mumbai – 400 001 **Ref:** Company Scrip Code: 532834	To, Listing Department, **National Stock Exchange of India Ltd**., Exchange Plaza, Bandra Kurla Complex, Bandra (East), Mumbai- 400051 **Ref:** Symbol: CAMLINFINE || Series: EQ

Sub: **Newspaper Advertisement-Disclosure under Regulation 30 and 47 of Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 ('SEBI Listing Regulations')**

Dear Sir/Madam,

Pursuant to Regulation 30 and 47 of the SEBI Listing Regulations, please find enclosed the extract of Notice of 33rd Annual General Meeting published in the Newspapers viz.- Financial Express (in English) and Loksatta (in Marathi).

Kindly take the above information on records.

Thanking you,
Yours faithfully,
For Camlin Fine Sciences Limited

RAHUL SAWALE
Digitally signed by RAHUL SAWALE
Date: 2026.07.19 19:38:37 +05'30'

Rahul Sawale
Company Secretary
& VP Legal

Encl.: a/a.

Registered Office:
Camlin Fine Sciences Limited, Floor 2 to 5, In G.S. Point, CST Road, Kalina, Santacruz (East), Mumbai 400 098.
CIN: L74100MH1993PLC075361

+91 22 6700 1000 +91 22 2832 4404 corporate@camlinfs.com www.camlinfs.com

आहारात प्रथिने अत्यंत महत्त्वाची

आरोग्य वार्ता

नवी दिल्ली : प्रथिने केवळ स्नायू मजबूत करण्यासाठीच नव्हे, तर रोगप्रतिकारक शक्ती वाढवणे, शरीराची झीज भरून काढणे आणि चयापचय क्रिया सुरळीत ठेवण्यासाठीही महत्त्वाची भूमिका बजावतात, असे तज्ज्ञांचे मत आहे. तज्ज्ञांनी रोजच्या आहारात प्रथिनांचे प्रमाण वाढवण्यासाठी काही सोपे उपाय सुचवले आहेत.

त्यांच्या मते, जेवणात डाळी, मोड आलेली कडधान्ये आणि भाजलेले हरभरे यांचा नियमित समावेश करावा. सॅलड, पोहे किंवा सँडविचमध्येही मोड आलेली कडधान्ये घालता येतात. तसेच जेवणाबरोबर एक वाटी अतिरिक्त डाळ घेणे फायदेशीर ठरते. दूध, दही आणि पनीर हेही प्रथिनांचे चांगले स्रोत आहेत. पनीरचा वापर भाजी, पराठे किंवा सँडविचमध्ये करता येतो, तर दही आणि दूध शरीराला आवश्यक पोषण देतात.

चपातीसाठी वापरल्या जाणाऱ्या गव्हाच्या पिठात बेसन, नाचणी किंवा सोयाबीनचे पीठ मिसळल्यास प्रथिनांचे प्रमाण वाढते. ही पद्धत संपूर्ण कुटुंबासाठी उपयुक्त ठरू शकते. याशिवाय शेंगदाणे, बदाम, तीळ, जवस आणि भोपळ्याच्या बिया यांचा नाश्ता किंवा मधल्या वेळेच्या खाण्यात समावेश करावा. शेंगदाण्याची चटणी किंवा कूटही आरोग्यदायी पर्याय आहे.

धारावी प्रकल्पासाठी आणखी जमीन

मुलुंड कचराभूमीच्या १५ एकर जागेवर कास्टिंग यार्ड

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या नावाखाली मुलुंडमधील आणखी १५ एकर जागा धारावी पुनर्वसन प्रकल्पाला (डीआरपी) देण्यात आली आहे. आतापर्यंत धारावी प्रकल्पासाठी अंदाजे ५०० एकर जागा देण्यात आली असून, आता याच मुलुंड डम्पिंग ग्राऊंडच्या १५ एकर जागेची भर पडली आहे. पुनर्विकास प्रकल्पाच्या कामासाठी लागणाऱ्या कास्टिंग यार्डसाठी ही जागा पाच वर्षांच्या भाडेतत्त्वावर महानगरपालिकेकडून डीआरपीला, पर्यायाने अदानी समूहाच्या नवभारत मेगा डेव्हलपर्स प्रा. लि. ला (एनएमडीपीएल) देण्यात आली आहे. या जागेसाठी ९८ कोटी ४६ लाख ८३ हजार ९१८ रुपये इतके भूभाडे आकारण्यात आले आहे.

आशियातील सर्वात मोठी झोपडपट्टी अशी धारावीची ओळख पुसून टाकून धारावीचा कायापालट करण्यासाठी धारावी पुनर्विकास प्रकल्प डीआरपीने हाती घेतला आहे. या प्रकल्पाचे कंत्राट अदानी समूहाला देण्यात आले आहे. दरम्यान, या प्रकल्पांतर्गत पहिल्यांदाच अपात्र रहिवाशांचेही पुनर्वसन करण्यात येणार आहे. मात्र, अपात्र रहिवाशांना धारावीत नव्हे, तर धारावीबाहेर विविध ठिकाणी भाडेतत्त्वावरील गृहप्रकल्पांत पुनर्वसित केले जाणार आहे. त्यानुसार या अपात्र रहिवाशांच्या पुनर्वसनासाठी डीआरपीने मुंबईतील विविध ठिकाणच्या कित्येक एकर जागेची मागणी राज्य सरकारकडे केली आहे.

धारावीच्या नावाखाली मिठागरांच्या जागा, मोकळ्या जागा मागण्यात आल्याने आणि त्या देण्यात येत असल्याने त्या-त्या ठिकाणच्या स्थानिकांमध्ये प्रचंड नाराजी, रोष आहे. मात्र, याकडे काणाडोळा करून जागा देण्याचा सपाटा राज्य सरकारने लावला आहे. मिठागराची २५५.९० एकर, देवनार कचराभूमीची १२४ एकर, माहिममधील रेल्वेची ४५ एकर, कुर्ला मदर डेअरीची २१.२५ एकर, मढची ३४ एकर, धारावी बेस्ट आगाराची ११.५८ एकर जागा धारावीसाठी देण्यात आली आहे. तर आता यात मुलुंड कचराभूमीच्या आणखी १५ एकर जागेची भर पडली आहे.

महानगरपालिकेच्या प्रमुख अभियंता (घनकचरा व्यवस्थापन) प्रकल्प यांच्या २ जुलैच्या एका पत्रानुसार, मुलुंड कचराभूमीची १५ एकर जागा धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी पाच वर्षांच्या भाडेतत्त्वावर देण्यात आली आहे. या पत्रानुसार प्रकल्पाच्या कास्टिंग यार्डसाठी ही जागा देण्यात आली आहे. तर एनएमडीपीएलकडून पाच वर्षांच्या कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरूपात या जागेची मागणी पालिकेकडे करण्यात आल्याचेही या पत्रात नमूद करण्यात आले आहे. या जागेसाठी पालिकेने ९८ कोटी ४६ लाख ८३ हजार ९१८ रुपये इतके भूभाडे आकारले आहे. दरम्यान, १५ एकर जागेवर अजूनही २.५ ते ३ लाख मेट्रिक टन कचरा आहे. त्यामुळे ही जमीन वापरण्यायोग्य करण्यासाठी साइट रेमेडिएशन, कचरा हटविणे, माती स्थिरीकरण आणि समपातळीकरण केले जाणार आहे. जागा देण्याचा सपाटा लावण्यात आल्याने स्थानिकांकडून प्रचंड नाराजी व्यक्त होत आहे.

गोल्फ कोर्स, विस्थापितांची वसाहत कुठे गेली?

मुलुंड कचराभूमीच्या जागेवर विस्थापितांच्या वसाहतीसह गोल्फ कोर्स उभारण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे. मात्र, आता या प्रकल्पाच्या जागेतील १५ एकर जागा पाच वर्षांसाठी धारावीसाठी देण्यात आली आहे. त्यामुळे गोल्फ कोर्स आणि विस्थापितांची वसाहत गेली कुठे, असा प्रश्न ॲड. सागर देवरे यांनी उपस्थित केला आहे. तर पाच वर्षांसाठी जरी ही जागा देण्यात आली असली, तरी ती परत पालिकेकडे हस्तांतरित होईल याची खात्री नसल्याचेही देवरे म्हणाले.

'कारवाई करताना भान ठेवा'

मुंबई : अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) एखाद्या रुग्णालयाचा परवाना तत्काळ निलंबित किंवा रद्द केल्यास रुग्णाने तिथून हातात सलाईन घेऊन तसेच बाहेर पडायचे का? उपचार सुरू असलेल्या रुग्णांनी अशावेळी काय करायचे? आयत्यावेळी त्यांनी कुठे जायचे? असा प्रश्न उच्च न्यायालयाने शुक्रवारी नवी मुंबईस्थित एका पंचतारांकित हॉटेलने केलेल्या याचिकेच्या निमित्ताने उपस्थित केला. तसेच, कारवाई करताना थोडे भान ठेवण्याचा सल्ला एफडीएला दिला.

स्वच्छतेच्या नियमांची पूर्तता न झाल्यास कारवाई करण्याचा एफडीएला पूर्ण अधिकार आहे. मात्र कारवाई करताना परवाना रद्द झालेल्या आस्थापनाला ते परिसर रिकामा करण्यासाठी व आपली बाजू मांडायला किमान वेळ मिळायला हवा. थेट कारवाईने अनेक बाबतीत नुकसान होऊ शकते, याची जाणीव एफडीएने ठेवायला हवी, असेही प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठाने एफडीएला सुनावले.

आजचा महाराष्ट्र वैचारिकदृष्ट्या दरिद्री!

ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. भालचंद्र मुणगेकर यांची खंत; 'य. दि. एक स्मरण' पुस्तकाचे प्रकाशन

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : एकोणिसाव्या आणि विसाव्या शतकाची आताच्या परिस्थितीशी तुलना करता, ते शतक अधिक समृद्ध होते. त्यावेळी ज्या पद्धतींचे वाद-विवाद होत होते, त्या मानाने आजचा महाराष्ट्र वैचारिकदृष्ट्या दरिद्री झाला आहे, अशी खंत ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी शनिवारी व्यक्त केली.

वासंती फडके लिखित 'य. दि. एक स्मरण' या पुस्तकाचे प्रकाशन शनिवारी पार पडले. यावेळी 'लोकसत्ता'चे संपादक गिरीश कुबेर, डॉ. भालचंद्र मुणगेकर आदी उपस्थित होते.

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचे इतिहास संशोधन मंडळ व अक्षर प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. वासंती फडके लिखित 'य. दि. एक स्मरण' या पुस्तकाचे प्रकाशन शनिवारी दादरच्या मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय सभागृहात पार पडला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून डॉ. मुणगेकर बोलत होते.

डॉ. मुणगेकर म्हणाले, आजच्या काळात स्वातंत्र्यवीर सावरकर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी ब्र काढणेही कठीण झाले आहे. अशा काळात य. दि. फडके यांनी दाखवलेले वैचारिक धाडस महत्त्वाचे वाटते.

यावेळी निवृत्त प्राध्यापक डॉ. अरुणा पेंडसे म्हणाल्या, फडके सरांनी फक्त इतिहासाबद्दलच कार्य केले, असे नाही तर त्यांनी वर्तमानाचा धागा कधी सोडला नाही. या प्रसंगी मान्यवरांची भाषणे झाली.

आजच्या काळात दस्ताऐवजीकरण करण्याची गरज उरली नाही, अशी एक प्रवृत्ती दिसून येते. अशावेळी कर्तव्यनिष्ठ, संशोधक वृत्तीचा इतिहासकार म्हणून य. दि. फडके यांचे स्मरण करणे अधिक महत्त्वाचे आहे, असे मत 'लोकसत्ता' चे संपादक गिरीश कुबेर यांनी व्यक्त केले.

ठाणे महापालिकेची भरती प्रक्रिया मार्गी

ठाणे : ठाणे महानगरपालिकेची अनेक दिवसांपासून रखडलेली भरती प्रक्रिया मार्गी लागली आहे. फायरमन पदासाठी होमगार्ड उमेदवारांना ५ टक्के समांतर आरक्षण लागू करण्याबाबत पालिकेने शुद्धीपत्रक काढले असून त्यानुसार १९ पदे होमगार्डसाठी राखीव ठेवण्यात आली आहेत. या निर्णयामुळे फायरमनसह एकूण ७०८ पदांच्या भरती प्रक्रियेला वेग आला आहे.

ठाणे महानगरपालिकेने गट 'क' आणि गट 'ड' संवर्गातील रिक्त पदांच्या भरतीबाबत महत्त्वाचे शुद्धीपत्रक प्रसिद्ध केले आहे. शासनाच्या ५ फेब्रुवारी २००८ च्या निर्णयानुसार, होमगार्डमध्ये किमान तीन वर्षे सेवा केलेल्या आणि फायरमन पदासाठी आवश्यक शैक्षणिक, शारीरिक आणि इतर पात्रता पूर्ण करणाऱ्या उमेदवारांसाठी फायरमन संवर्गातील ५ टक्के समांतर आरक्षण लागू करण्यात आले आहे.

त्यानुसार एकूण १९ पदे होमगार्ड उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात आली आहेत. या निर्णयामुळे रखडलेली भरती प्रक्रिया पुढे सरकली असून, लवकरच फायरमनची ३८१ पदे, अभियंता संवर्गातील १०७ पदे, सहाय्यक फायरमनची १३ पदे आणि चालक-यंत्रचालकांची २०७ पदे अशा एकूण ७०८ पदांची भरती केली जाणार आहे.

'एलआयसी'चे खासगीकरण करू नये - सुप्रिया सुळे

मुंबई : भारतीय आयुर्विमा महामंडळाने (एलआयसी) देशवासीयांचा विश्वास संपादन केला आहे. सरकारच्या काही मोजक्या उपक्रमांपैकी फायद्यात असलेला हा उपक्रम आहे. सरकारलाही आम्ही काहीतरी चांगले करत आहोत, असे सांगता येईल, असा हा उपक्रम आहे. त्यामुळे केंद्र सरकारने 'एलआयसी'चे खासगीकरण करू नये, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्याध्यक्ष खासदार सुप्रिया सुळे यांनी केली आहे.

मुंबई येथे आयोजित 'ऑल इंडिया नॅशनल लाईफ इन्शुरन्स एम्प्लॉईज फेडरेशन'च्या कार्य समितीच्या बैठकीत त्या बोलत होत्या.

ठाण्याहून अंबरनाथ प्रवासाला अडीच तासांचा वेळ

उड्डाणपूल, काँक्रीटीकरणानंतरही वाहतूक कोंडी कायम

लोकसत्ता प्रतिनिधी

ठाणे : ठाण्याहून उल्हासनगर, अंबरनाथ आणि बदलापूरकडे जाणारा प्रवास नागरिकांसाठी दिवसेंदिवस अत्यंत वेळखाऊ आणि मनस्तापाचा ठरत आहे. शुक्रवारी सायंकाळी याच मार्गावरील जीवघेण्या वाहतूक कोंडीचा फटका चाकरमान्यांना बसला. ठाणे शहरातून अंबरनाथ शहरात पोहोचण्यासाठी प्रवाशांना तब्बल दोन ते अडीच तासांचा वेळ लागला.

यापूर्वी खड्डे आणि पलावा येथील अरुंद पुलामुळे होणारी कोंडी आता काहीशी सुटली असली तरी, रस्त्यांवरील अचानक अरुंद होणाऱ्या मार्गिका, चौकांमधील बेशिस्तपणा आणि रखडलेल्या भूसंपादनामुळे कोंडीची नवी ठिकाणे आता उदयास आली आहेत. त्यामुळे रस्ते आणि पुलांची कामे होऊनही प्रवाशांच्या पदरी निराशाच पडली आहे.

अंबरनाथ-काटई आणि काटई-शिळफाटा हा मार्ग कोंडीचा आहे. येथे मेट्रो, उन्नत मार्ग आणि बुलेट ट्रेनसारख्या प्रकल्पांच्या गाजावाजा झाल्याने असंख्य व्यावसायिक आस्थापना आणि इमारती उभ्या राहिल्या आहेत. वाढत्या वर्दळीमुळे प्रशासनाने मुंब्रा बायपासवर वाय जंक्शन पूल, शिळफाट्यावर उड्डाणपूल आणि कल्याण फाट्यावर मार्गिका विलगीकरण केले. मात्र, या उपायांनंतरही अनेक ठिकाणी रस्ते अचानक अरुंद होत असल्याने कोंडी वाढली आहे.

कोकणरत्न हॉटेल, किंग्स हॉटेल आणि शालू धाब्याजवळ तीन ते चार पदरी रस्ता अचानक दोनपदरी होतो. परिणामी, वाहनांच्या लांब रांगा लागून वाहतूक संथगतीने पुढे सरकते. देसाई गावाच्या चौकात आणि रस्त्याच्या कडेला असलेल्या साडी, फर्निचरच्या दुकानांबाहेर होणाऱ्या पार्किंगमुळेही वाहनांचा वेग मंदावतो.

मॅनहोल दुर्घटनेच्या अहवालाची प्रतीक्षाच

१५ दिवसांनंतरही प्रशासनाची उदासीनता

लोकसत्ता खास प्रतिनिधी

मुंबई : चेंबूरमधील झाड दुर्घटनेच्या अहवालावरून राजकारण तापलेले असताना या गदारोळात साकीनाका येथे मॅनहोलमध्ये पडून एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याच्या दुर्घटनेचा चौकशी अहवाल मात्र रखडला आहे. दुर्घटनेला १५ दिवस उलटून गेले तरी अद्याप प्रशासनाने अहवाल जाहीर केलेला नाही.

कुर्ला साकीनाका येथील खैरानी मार्गालगत मॅनहोलवर संरक्षक जाळी बसवण्याची कार्यवाही सुरू असताना २ जुलै रोजी असलम इसाक शेख (५५) तिथून जात होते व अचानक ते मॅनहोलमध्ये पडले आणि वाहून गेले. १०० मीटर अंतरावर असलेल्या दुसऱ्या मॅनहोलमध्ये त्यांचा मृतदेह मिळाला. या दुर्घटनेची पालिका आयुक्त आश्विनी भिडे यांनी गंभीर दखल घेतली व या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याचे आदेश दिले. चौकशीचा अहवाल सात दिवसांत देण्याचे आदेशही पालिका आयुक्तांनी दुर्घटनेच्या दिवशी दिले होते. चौकशीसाठी समितीही स्थापन करण्यात आली होती. मात्र दुर्घटनेला १५ दिवसांपेक्षा अधिक कालावधी उलटल्यानंतरही या घटनेचा चौकशी अहवाल प्रशासनाने जाहीर केलेला नाही.

दरम्यान, साकीनाका दुर्घटनेच्या दोनच दिवस आधी चेंबूरमध्ये शाळेच्या बसवर झाड पडून एका विद्यार्थ्याचा मृत्यू झाला होता. या घटनेच्या चौकशी अहवालात सर्व अधिकाऱ्यांना निर्दोष सोडल्यामुळे पालिका प्रशासनावर टीका झाली. महापौर रितू तावडे यांनी हा अहवाल फेटाळला व पुन्हा चौकशीचे निर्देश दिले. त्यामुळे साकीनाका दुर्घटनेच्या अहवालाबाबत प्रशासनाने सावध भूमिका घेतल्याची चर्चा आहे.

साकीनाका दुर्घटनेप्रकरणी साकीनाका पोलीस ठाण्यात कंत्राटदाराविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.